राज्यातील किरकोळ केरोसिन परवानाधारकांचे कमिशन सुधारीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-रॉकेल-२०२६/प्र.क्र.५५/नापु-२७**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- ०१ एप्रिल, २०२६

वाचा:- १. शासन निर्णय क्र. रॉकेल-२०१९/प्र.क्र.४६/ना.पु.२७ दि.०६ मार्च २०१९
२. शासन निर्णय क्र. रॉकेल-२०२६/प्र.क्र.५२/ना.पु.२७ दि.२५ मार्च २०२६

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्यात गेल्या काही वर्षांपासून पंतप्रधान उज्ज्वला योजना व इतर योजनांद्वारे एलपीजी गॅस कनेक्शन मोठ्या प्रमाणात वितरीत करण्यात आले आहेत. त्यानुसार, गॅस कनेक्शन असणाऱ्या कुटुंबांना केरोसिन वितरण न करण्याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जनहित याचिका क्र.१६/२०१४ (कडूजी देवबा पंड वि. केंद्र शासन) मध्ये दि. ७/०१/२०१६ रोजी आदेश दिले होते. त्यामुळे राज्यभरात केरोसिनचे अत्यंत मर्यादित स्वरुपात वितरण करण्यात येत होते. सद्यस्थितीत सदर केस बंद झाली आहे, असे सरकारी वकील यांनी शासनास कळविले आहे. परंतू, सद्यस्थितीत भू-राजकीय परिस्थितीमुळे एलपीजीचा तुटवडा जाणवत असल्याने केंद्र शासनाने दिनांक १२/०३/२०२६ रोजीच्या आदेशान्वये राज्यास ३७४४ कि.ली. एवढे नियतन मंजूर केले आहे. त्यानुषंगाने एलपीजीला पर्यायी इंधन म्हणून तात्पुरत्या स्वरुपात केरासिन वितरण करण्याकरीता शासनाने आदेश पारित केले आहेत. सबब, राज्यातील किरकोळ परवानाधारकांच्या कमिशन मध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त नमूद पार्श्वभूमीनुसार राज्यातील किरकोळ परवानाधारकांच्या कमिशनमध्ये खालील प्रमाणे वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

| परवानाधारकांचा प्रकार | सध्याचे कमिशन | सुधारित कमिशन |
|---|---|---|
| किरकोळ परवानाधारक | रु. ६७५/- प्रति कि.ली. (तुटीच्या लाभासह) | १३५०/- प्रति कि.ली. (तुटीच्या लाभासह) |

२. सर्व जिल्हाधिकारी व नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांनी सार्वजनिक वितरण व्यवस्थेतंर्गत प्रचलित एक्स-डेपो दर, एक्स डेपो दरावर जी. एस. टी. घाऊक वितरकांचे कमिशन, प्रचलित वाहतूक दर, तापमान बदलामुळे येणाऱ्या घटीच्या व हाताळणूक तुटीच्या प्रतिपुर्तीसाठी असाधारण भत्ता, डिझेल व्यतिरिक्त इतर अनुषंगिक बाबींचा खर्च, किरकोळ वितरकांचे सुधारित कमिशन प्रकरणपरत्वे जी.एस.टी. व इतर अनुषंगिक बाबी विचारात घेऊन जिल्हयातील तसेच मुंबई शिधावाटप क्षेत्रातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत केरोसिनचे सुधारित दर निश्चित करुन तातडीने अधिसूचना निर्गमित करावी व त्याची प्रत शासनास पाठवावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४०११६४१२५८८०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ASHOK MAROTI ATRAM
Date: 2026.04.01 16:42:05 +05'30'

**(अशोक आत्राम)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. सर्व विभागीय आयुक्त
२. नियंत्रक रेशनिंग व संचालक नागरी पुरवठा, मुंबई
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व उपायुक्त (पुरवठा)
५. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
६. अन्न वितरण अधिकारी (पुणे / सोलापूर / नागपूर)
७. मा. मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे खाजगी सचिव
८. मा. राज्यमंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे खाजगी सचिव
९. निवडनस्ती नापु-२७